# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# कोयना एज्युकेशन सोसायटीचे बी. डी. कॉलेज सहा पुरस्कारांनी सन्मानित

▲ **पाटण**, दि. ८ : महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या करियर कट्टा या उपक्रमांतर्गत पाटण येथील कोयना एज्युकेशन सोसायटी संचलित बाळासाहेब देसाई कॉलेजला ६ पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

उच्च शिक्षणाला बळ मिळावे या उद्देशाने हा अभिनव उपक्रम गेल्या चार वर्षांपासून सुरू आहे. या उपक्रमांतर्गत सन २०२४-२५ या वर्षात घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय महाविद्यालयीन स्पर्धा २०२४-२५ चा निकाल जाहीर करण्यात आला. या राज्यस्तरीय स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीबद्दल बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटणला ६ पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यामध्ये कोल्हापूर विभागातून उत्कृष्ट महाविद्यालय म्हणून प्रथम क्रमांक तसेच उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालय यामध्ये प्रथम क्रमांक मिळाला आहे. उत्कृष्ट जिल्हास्तरीय प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांना पुरस्कार प्राप्त झाला आहे. उत्कृष्ट जिल्हा समन्वयक म्हणून डॉ. संदीप तडाखे यांना प्रथम क्रमांक पुरस्कार, उत्कृष्ट जिल्हास्तरीय तालुका समन्वयक प्रा. श्रीगणेश गायकवाड प्रथम क्रमांक तसेच उत्कृष्ट जिल्हास्तरीय महाविद्यालयीन समन्वयक म्हणून प्रा. गंगाराम चव्हाण यांना प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.



पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. एस. डी पवार व इतर.

बाळासाहेब देसाई महाविद्यालयास सहा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल पाटण तालुक्याचे भाग्यविधाते माजी मंत्री श्रीमंत विक्रमसिंह पाटणकर, पाटण विधानसभा मतदारसंघाचे नेते, सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक श्रीमंत सत्यजितसिंह पाटणकर, कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, उपाध्यक्ष प्रकाशराव पाटील, जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर, जॉईंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संस्थेचे संचालक याज्ञसेन पाटणकर, संचालक संजीव चव्हाण तसेच महाविद्यालयाच्या नॅक समन्वयक डॉ. एच. व्ही. काटे, सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सेवक तसेच पाटण तालुक्यातील विविध सामाजिक संघटनांनी अभिनंदन केले.